

# हेमंत धात्रक यांचे कार्य कौतुकास्पद

## ना. छगन भुजबळ : नागरी सत्कार सोहळा

**नाशिक : वार्ताहर**

व्ही. एन. नाईक शिक्षण संस्थेचे सरचिटणीस, नामको बँकेचे संचालक, सहकार, शेतकरी, अभियंता, शिक्षण तज्ज्ञ, व्यापारी आदी विविध माध्यमातून जनसेवेचे व्रत घेतलेले हेमंत धात्रक यांचे कार्य कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री ना. छगन भुजबळ यांनी केले.

नाशिक शहराची मान अभिमानाने उंचावणारे जे काही लोक शहरात आहेत. त्यामध्ये धात्रक यांचा नामोल्लेख करावाच लागेल. आपल्या अर्ध्या तासाच्या प्रखर भाषणात ना. भुजबळ यांनी धात्रक यांच्या विविध कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेल्या केंद्रीय मंत्री ना. भारती पवार यांनी पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यपीठातर्फे जीवनसाधना गौरव पुरस्कार धात्रक यांना मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. विद्यपीठ हा पुरस्कार देताना प्रत्येक माणसाचे सर्व गुण विविध माध्यमातून तपासून घेतात. आणि नंतरच पुरस्कार देण्याचा निर्णय घेत असतात. धात्रक हे सर्व गुणांमध्ये परिपूर्ण असल्यामुळेच त्यांच्या कामाची पोचपावती विद्यापीठाने त्यांना दिली. यावेळी धात्रक यांच्या हातून अजून अनेक समाजोपयोगी कामे होत राहो अशा शुभेच्छा दिल्या. सत्काराला उत्तर देताना हेमंत धात्रक यांनी मी जे काही काम केले, त्याला सर्व समाजाची साथ मिळाली म्हणून आज माझा सत्कार होत आहे. याप्रसंगी ना. भुजबळ यांच्या हस्ते हेमंत धात्रक यांचा व माधुरी धात्रक यांचा सत्कार ना. भारतीताई पवार यांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, माजी कुलगुरू नितीन करमाळकर, प्रभारी कुलगुरू पराग काळकर, विद्यापीठाचे अधिसभा सदस्य प्रसेनजीत फडणवीस आदींची धात्रक यांचा गुणगौरव करणारी भाषणे झाली. प्रास्ताविक ॲड. जयंत जायभावे यांनी केले. आभार म.वि.प्र चे सरचिटणीस नितीन ठाकरे यांनी मानले. मानपत्राचे वाचन माजी उपमहापौर गुरुमित बग्गा यांनी केले. गोखले एज्युकेशन सोसायटीच्या गुरुदक्षिणा हॉल येथे झालेल्या या भव्यदिव्य समारंभास आ. देवयानी फरांदे, माजी आमदार वसंत गिते, जयंत जाधव, बाळासाहेब सानप, राजाभाऊ वाजे, पंढरीनाथ थोरे, नामको बँकेचे चेअरमन सोहनलाल भंडारी, व्हा. चेअरमन रंजन ठाकरे, जनसंपर्क संचालक अशोक सोनजे, माजी महापौर अशोक मुर्तडक, दत्ता नाना गायकवाड, सुरेश अण्णा पाटील, शिवाजी गांगुर्डे, कोंडाजी मामा आव्हाड, संदीप गुळवे, अजित सुराणा, झुंबरलाल भंडारी, विजय साने डॉ. डी. एल. कराड, शैलेश गोसावी, महेश दाबक, हेमंत देशपांडे, अजिंक्य वाघ, मामा मोरे, श्रीमती हेमलता बिडकर, कुणाल दराडे, भानुदास चौधरी, नरेंद्र पवार, प्रकाश दायमा, सुभाष नहार, हरीश लोढा, अविनाश गोठी, प्रफुल्ल संचेती, देवेंद्र पटेल, प्रशांत दिवे, विश्राम दीक्षित उपस्थित होते. विविध संस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.